स्थापना : १९५२

" एकच ध्यास ग्रामविकास "

# ग्रामपंचायत बावडा

ता. खंडाळा, जि. सातारा.

जावक क्र :

दिनांक / /

प्रति,
माननीय,
व्यवस्थापकीय विश्वस्त,
युथबिल्ड फौंडेशन, पुणे.

महोदय,

कळवण्यास आनंद होतो आहे की, आपण आपले गाव बावडा ता. खंडाळा जि. सातारा येथे सुमारे अंदाजे रु. २.५ ते रु. ३.० कोटी खर्च करून जुलै २०२० ते डिसेंबर २०२३ ह्या दरम्यान खालील प्रकल्प पूर्ण केलेले आहेत व सध्या त्यांची देखभाल सुद्धा करत आहात.

१. भैरव बंधारा - खर्च अंदाजे रुपये एक कोटी व अर्धा टीएमसी पाणी साठवण्याची क्षमता. त्यामुळे परिसरातील शंभर ते दीडशे विहिरींना पाणी मिळाले आहे व तसेच त्यामुळे आजूबाजूच्या पाच किलोमीटर परिसरात पाण्याचा प्रवाह तयार झाला आहे.

२. धरण परिसरात सुमारे १२ एकर जमीनीवर २५०० मोठ्या झाडांची लागवड व देखभाल आपण केलेली आहे यात वड, पिंपळ, काटेसावर, पांगारा, आपटा, लिंब, गुलमोहर, नीलमोहोर, बोगनवेल इत्यादिंचा समावेश आहे.

३. आपल्याकडून सुमारे तीन एकर परिसरात बटरफ्लाय गार्डन विकसित करण्यात आले असून त्यात शेकडो वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावण्यात आलेली आहेत.

४. आपल्याकडून सुमारे पाच एकरात क्रीडांगणाचा विकास करण्यात आला आहे व त्याचा लाभ गावातील तरुण व्यक्ती तसेच आजूबाजूच्या कंपन्यातील कर्मचारी घेत आहेत.

५. आपल्या पाठपुरवठ्यामुळे केसर्डी ते बावडा हा तीन किलोमीटरचा रस्ता महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून पूर्ण झाला आहे.

आम्ही या सर्व प्रयत्नांबद्दल आपले आभारी आहोत.

धन्यवाद.

आपला विश्वासू

ग्रामसेवक
ग्रामपंच

श्री जाधव एस. बी
ग्रामसेवक
ग्रामपंचायत बावडा
ता खंडाळा, जि. सातारा